सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
दुरध्वनी क्र. ०२०-२६१२२८४६/४७ commcoop२०११ @gmail.com

जा.क्र.ना.बँका/सआ-१/ना.सह.बँक/राखीव निधी/परि/१६ /८०५
दिनांक : ५ / ४ /२०१६.

16 APR 2016 (१६०३)

विषय :- जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत नागरी सहकारी बँकांनी राखीव निधीपोटी केलेली गुंतवणूक परत मिळणेबाबत.

## -: परिपत्रक :-

रिझर्व बँक ऑफ इंडिया यांचे दिनांक ०५/०६/२०१४ चे परिपत्रक व नोटीफिकेशननुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व राज्य सहकारी बँकेतील गुंतवणुक रक्कम तरलता (एस.एल.आर.) साठी फक्त माहे मार्च, २०१५ पर्यंत गणली जाईल असे नमूद आहे. त्यामुळे दिनांक ०१ एप्रिल, २०१५ पासुन पुढील कालावधीसाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील नागरी सहकारी बँकेनी केलेली राखीव निधीतील गुंतवणूक वैधानिक तरलता (SLR) धरली जाणार नसल्यामुळे राखील निधी काढणे आवश्यक असल्याचे दिसून येते. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम ५४ (२) चे परंतुकान्वये ज्या संस्थेच्या राखीव निधी, तिच्या भरणा केलेल्या भागभांडवलाइतका किंवा त्यापेक्षा जास्त असेल अशा संस्थेच्या बाबतीत, निबंधकाला सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाव्दारे त्या संस्थेस तिच्या भरणा केलेल्या भाग भांडवलापेक्षा अधिक असेल अशा राखीव निधीचा भाग, त्यांच्या व्यवसायात गुंतविण्यास परवानगी देता येईल अशी तरतुद आहे.

रिझर्व्ह बँकेचे उक्त परिपत्रकानुसार सदरची गुंतवणूक सरकारी राख्यात अथवा राष्ट्रीयीकृत बँकेत करणेबाबत नागरी सहकारी बँका निर्णय घेत असून त्यानुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये राखीव निधीपोटी केलेली गुंतवणुक परत मिळणेबाबतचे प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त होत आहेत. सदर बाब विचारात घेऊन नागरी सहकारी बँकांनी राखीव निधीपोटी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये केलेली गुंतवणूक परत मिळणेबाबत या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे दि.०५/०६/२०१४ चे परिपत्रक व नोटीफिकेशन नुसार नागरी सहकारी बँकेना कार्यवाही करणे आवश्यक असल्याने एस.एल.आर.साठी आवश्यक असलेल्या निधीसाठी कमी पडणारी रक्कम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका मध्ये गुंतवणूक केलेल्या राखीव निधीतुन काढून सरकारी रोख्यामध्ये / राष्ट्रीयीकृत बँकेत गुंतवणूक करणेस परवानगी देण्यात येत आहे.

सही/-
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत : विभागातील/जिल्हयातील सर्व नागरी सहकारी बँकांचे निदर्शनास आणुन देणेसाठी.
१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)



नाशिक